# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्स

प्रेसनोट २६८ - २२ दिनांक ०२/०९/२०२२

## हौसींग डॉट कॉम पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने स्वस्तदरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन फसवणुक करणा-या मुख्य आरोपीस पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नालासोपारा परिसरात गेल्या काही महिन्यापासुन हौसींग डॉट कॉम पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सामान्य नागरिकांची फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दि. २० नोव्हेंबर २०२१ ते माहे फेब्रुवारी २०२२ या दरम्यान फिर्यादी नामे - श्रीमती. स्नेहा प्रमोद भालेकर, वय ५१ वर्षे यांना एस.एस. इंटरप्रायजेसचा मालक शेखर सिंग, फ्लॅटचा मालक नसीम खान, शिफा अली, अल्ताफ शेख व पाहिजे आरोपीत यांनी सर्वांनी मिळून आपसात संगणमताने व लबाडीच्या इरादयाने स्वतःच्या फायदयाकरिता फिर्यादी यांचे कडुन एकूण ८,५०,०००/- रु घेवुन फिर्यादीस नालासोपारा पश्चिम येथील ऑरेंज हाईटस बिल्डींग मधील रुम नं. ५०४, डी विंग हा फ्लॅट त्यांना विकत न देता फिर्यादीची फसवणूक केली म्हणुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६९/२०२२ भा.द.वी.सं. कलम. ४२०, ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद होता.

सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ यांचेकडे देण्यात आला. गुन्हयात यापुर्वी ४ आरोपीत यांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयातील मुख्य आरोपीत याचेबाबत गुप्त बातमीदार यांचेकडून माहिती मिळवुन आरोपीत नामे - मो. अय्युब याकुब शेख वय - ३२ वर्षे, रा. व्हिला नंबर ०९, रुम नंबर ०३, स्पॅनिश रेसिडेंन्सी, चिचोटी, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक २४/०८/२०२२ रोजी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. त्याचे कडे सखोल तपास करता त्याने अटक आरोपीतांबरोबर आपआपसात संगणमत करुन स्वस्त दरात घर विकत घेऊ इच्छीत सामान्य नागरीकांना हेरुन त्यांना वेगवेळया फर्मच्या नावे संपर्क साधुन नालासोपारा पश्चिम परिसरातील यशवंत गौरव भागातील सदनिका स्वस्त दरात विक्री करीत असल्याचे भासवुन सदर सदनिकाच्या खरेदी व्यवहाराचे पैसे हे बनावट कागदपत्राव्दारे बोगस बॅक खाते उघडुन त्या खात्यावर पैसे स्विकारुन फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले असुन आहे. उक्त आरोपीत याचा खालील नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न होत आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | नालासोपारा पो.स्टे | ६९/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| २ | नालासोपारा पो.स्टे | १५३/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| ३ | नालासोपारा पो.स्टे | १८८/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| ४ | नालासोपारा पो.स्टे | २३१/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| ५ | नालासोपारा पो.स्टे | ३५२/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ |
| ६ | नालासोपारा पो.स्टे | ३५३/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,३४ |

आरोपीत मो. अय्युब याकुब शेख हा नालासोपारा पोलीस ठाण्याचे गुन्हयामध्ये अटक असुन सद्या पोलीस कोठडी मध्ये आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, पो.हवा./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, पो.अं/ अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.